*‘पिफ’ २०२४*

# नव्या कल्पनांची मुहूर्तमेढ रोवणारे महिलाप्रधान चित्रपट

विनया कुर्तकोटी
अनुवाद : श्रुती कुलकर्णी

चित्रपट दिग्दर्शकांबद्दल विचार करायला गेल्यास स्टॅनली कुब्रिक, क्विंटन टॅरँटिनो किंवा जीन-ल्यूक गोदार्द यांसारख्या पुरुषांची नावे सहज डोळ्यांसमोर येतात. परंतु महिला दिग्दर्शकांच्या नावांचा विचार करताना ग्रेटा गेरविग हे नाव ठळकपणे आठवते.

२०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बार्बी' चित्रपटाने ग्रेटा गेरविगला जागतिक प्रसिद्धी मिळवून दिली आणि पिढ्यानपिढ्या पुरुषप्रधान असलेल्या या क्षेत्रात, तिने एक नवीन आव्हान निर्माण केले.

आज पूर्वीपेक्षा जास्त महिला, चित्रपट दिग्दर्शन क्षेत्रात उतरल्या असल्याने या क्षेत्रात महिलांची प्रगती नक्कीच झाली आहे. परंतु चित्रपट निर्मिती जगतात मात्र महिलांची संख्या त्यांच्या समतुल्य पुरुषांच्या तुलनेत नगण्य आहे, हे कटू वास्तव नाकारून चालणार नाही.

सिनेक्षेत्रात महिला दिग्दर्शकांची संख्या अतिशय कमी असली, तरी त्यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांच्या पटकथा या नावीन्यपूर्ण आणि उत्कृष्ट दर्जाच्या असतात, ज्या प्रेक्षक आणि समीक्षकांची दाद मिळवण्यास आतुर आहेत.

याचे एक मार्मिक उदाहरण द्यायचे झाल्यास, डच चित्रपटनिर्मात्या स्टेफनी कोल्क यांच्या 'मिल्क' चित्रपटाचे कथानक! ही कथा मृत बालकाला जन्म दिलेल्या स्त्रीची व्यथा मांडते. ही कथा दूध दान करून ती माता मृत बालकाच्या दुःखातून कशी बाहेर पडते, याचे भावूक वर्णन करते.

महिला कथाकारांच्या कथांमध्ये एक वेगळा भावनिक दृष्टीकोन असतो आणि महिलांच्या विविधांगी अनुभवांचे चित्रण अशा चित्रपटांमध्ये असते.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या (पिफ) जागतिक चित्रपट स्पर्धेत असे काही विशिष्ट चित्रपट दाखवण्यात येत आहेत.

यामध्ये जर्मन चित्रपट निर्मात्या सिल्के एन्डर्स यांचा 'श्लामॅसेल' हा एक चित्रपट आहे. ज्याची पटकथा एका तरुण महिला पत्रकाराभोवती फिरते. महिला शिबिरासंदर्भातील तपासादरम्यान

तिच्या आजीचा मृत्यू होतो आणि मग तिचा अतिशय दुःखद आणि गुंतागुंतीचा प्रवास सुरू होतो, जो प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवतो.

आवर्जून पहावा असा आणखी एक चित्रपट म्हणजे मॉली मॅनिंग वॉकर यांचा दिग्दर्शन क्षेत्रातील पहिलाच चित्रपट - 'हाऊ टु हॅव सेक्स', मी टू (#MeToo) चळवळ,लैंगिक शिक्षण आणि लैंगिक संबंधातील संमतीबद्दल बोलतो.

फ्रेंच-कॅनेडियन चित्रपट निर्मात्या एरियन लुई-सीझ यांचा 'ह्युमॅनिस्ट व्हॅम्पायर सीकिंग कन्सेंटिंग सुसाइडल पर्सन' हा नव्या पिढीचा चित्रपट. 'टीन रॉम-कॉम' या नव्या शैलीतील हा चित्रपट कॉमेडी, रोमान्स आणि पौगंडावस्थेतील भावनिक गुंतागुंत यांचा सुंदर मिलाफ आहे.

क्लोय रोबिकॉड यांचा 'डेज ऑफ हॅपीनेस' हा कॅनेडियन चित्रपट मॉन्ट्रियलमधील ऑर्केस्ट्रा कलाकार असणाऱ्या एम्मा या तरुणीची कथा सांगतो. करिअर, कौटुंबिक तणाव आणि सेलोवादक मित्रासोबतचे प्रेमसंबंध यांमधील संघर्षात ती साधत असलेला ताळमेळ, या चित्रपटात उत्कृष्टरित्या दाखवण्यात आला आहे.

हे सर्व चित्रपट जगाच्या वेगवेगळ्या कानाकोपऱ्यातील स्त्री जीवनातील गुंतागुंतीचे भावविश्व दाखवतात.

फ्रेंच क्रीडा जगतातील एलजीबीटीक्यु भेदभावाचा शोध घेणारा 'मॅरिनेट' हा चित्रपट मॅरिनेट पिचॉनच्या आत्मचरित्रावर आधारित आहे. व्हर्जिनी व्हेरिअर निर्मित या चित्रपटात फ्रेंच इतिहासातील एका महान फुटबॉलपटूच्या संघर्षाचे चित्रण असून, तो समीक्षकांच्या प्रशंसेलाही पात्र ठरला आहे.

दुसरीकडे, पोर्तुगीज 'पेडाजिओ' आपल्याला एका वेगळ्या प्रवासाला घेऊन जातो. डायरेक्टर कॅरोलिना मार्कोविचच्या कथेची नायिका तिच्या मुलाच्या महागड्या ट्रान्सफॉर्मेशन थेरपीसाठी निधी गोळा करतानाच गुन्हेगारी जीवनात अडकते. ही कथा आई आणि मुलाचे गुंतागुंतीचे नाते उलगडत नेते. आपल्या मुलाचे रक्षण करणाऱ्या आईच्या भूमिकेतून नायिकेबद्दल सहानुभूती दाखवत ही कथा ढोंगी आणि दांभिक समाजाला आरसा दाखवते.

जपानी चित्रपट निर्माता कियोहारा युई यांचा 'सुबेते नो योरू वो ओमोइदासु' (रिमेंबरिंग एव्हरी नाईट) हा या वर्षीच्या 'पिफ'मध्ये चुकवू नये, असा आणखी एक वेगळा चित्रपट! हा चित्रपट टोकियोतील तीन स्त्रियांच्या वेगवेगळ्या जीवनकथा एकत्रितपणे गुंफतो.

सोबतच प्रसिद्ध महिला दिग्दर्शिका जॅकलीन व्हॅन वुग्ट यांचा 'क्रॉसिंग', मिलेना अबोयान दिग्दर्शित 'इलाहा' आणि सुबादेह मोर्तझाई यांचा 'युरोपा' यांसारख्या अनेक महिलाप्रधान

चित्रपटांची मोठी संख्या असलेला असा हा बाविसावा पुणे आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १८ जानेवारी २०२४ रोजी सुरू होत आहे.

-----------------------